**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 39** **September - October - 2025**

# ग्रंथालयातील सेवा माहिती आणि ज्ञान संपादनाची साधने

**सौ.वर्षा मिथुन गंगधर[1], कु. मनीषा बजरंग कलमडे[2]**
*[1]जी. ए .कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली*
*[2]क.वा.महाविद्यालय, सांगली*
*Corresponding Author – सौ. वर्षा मिथुन गंगधर*
**DOI - 10.5281/zenodo.17282878**

**सारांश:**

*मानवाचा विकास करण्यासाठी ज्ञान आणि माहितीची भूमिका खूप महत्त्वाचे आहे एकविसाव्या शतकात खूप मोठ्या प्रमाणात ज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. मानवाची प्रगती करण्यासाठी ग्रंथालयातील माहिती साधने व सेवांचा खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होतो आहे. समाजाच्या विविध क्षेत्रात ज्ञान व माहितीची गरज आहे या माहिती साधनांचा वापर करून व्यक्ती आपल्या आयुष्यात प्रगती करू शकतो समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रात ग्रंथालयातील माहिती व ग्रंथालयांनी पुरविलेल्या सेवांचा खूप मोठ्या प्रमाणात वापर होत आहे ग्रंथालय हे फक्त पुस्तकांचे भांडार नसून तो ज्ञानाचा महासागर आहे जे वाचकांना माहिती आणि सेवा देण्याचे कार्य पार पाडते. ग्रंथालयामध्ये पारंपारिक सेवा व आधुनिक सेवा पुरविल्या जातात पारंपारिक सेवेमध्ये वाचनालय सेवा पुरवली जाते यामध्ये वाचकांना आवश्यक असलेली पुस्तके नियतकालिके वृत्तपत्रे तसेच संदर्भसेवा या पुरविल्या जातात संदर्भ सेवेमध्ये वैयक्तिकरित्या सेवा पुरविले जाते यामध्ये विश्वकोश शब्दकोश ग्रंथसूची यांच्या सहाय्याने अचूक माहिती मिळते तसेच ग्रंथालयामधील देवघेव सेवा पुरविले जाते यामध्ये दुर्मिळ ग्रंथ आणि काही संशोधन साहित्य पुरविण्याचे कार्य केले जाते तसेच वाचन प्रबोधन कार्यक्रम व्याख्याने चर्चासत्रे हेही ज्ञान प्रसारासाठी प्रभावी ठरतात आधुनिक ग्रंथालय सेवेमध्ये डिजिटल लायब्ररी, ऑनलाइन संदर्भ सेवा, मल्टीमीडिया साधने, एन शोधगंगा, डेलनेट, जे स्टोअर, या सेवा पुरविल्या जातात.*

*ग्रंथालय माहिती व ज्ञान संपादनाची साधने पुरवते. या शोधनिबंधामध्ये माहिती व ज्ञान संपादनाची साधने, पारंपारिक सेवा, आधुनिक सेवा, आव्हाने या सेवांचा मानवी विकासासाठी खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे. या सर्व गोष्टींचा यात आढावा घेतला आहे ग्रंथालय हे माहितीचे माहिती व ज्ञानाचे खूप मोठे केंद्र आहे मानवी जीवनात शिक्षण घेण्यासाठी संशोधन करण्यासाठी किंवा व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असणारी माहिती ग्रंथालयात सहज उपलब्ध होते. आजच्या ज्ञान योगात व माहितीच्या महासागरात योग्य माहितीची निवड करून ती वापरकर्त्यापर्यंत पोहोचविण्याचे कार्य ग्रंथालय मधून होत आहे.*

---

**प्रस्तावना:**

ग्रंथालयातील सेवा या खूप प्रभावी आहेत. या सेवांचा उपयोग वापर करताना खूप मोठ्या प्रमाणात होतो ग्रंथालयामध्ये पारंपारिक आणि आधुनिक दोन्ही प्रकारच्या सेवा दिल्या जातात पारंपारिक आणि आधुनिक या दोन्ही सेवांचा उपयोग प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना खूप मोठ्या प्रमाणात होत आहे. ग्रंथालयात योग्य अशा ग्रंथा संबंधी आधीच माहिती मिळवणे व ती वाचकांना उपलब्ध करून देणे ग्रंथपालांना प्राध्यापकांनी त्यांच्या अभ्यासक्रमानुसार पुस्तकांची

लिस्ट देणे आवश्यक असते प्राध्यापक त्या त्या क्षेत्रातील तज्ञ असल्याने त्यांनी दिलेली पुस्तकांची लिस्ट ग्रंथपाल त्यानुसार पुस्तकांची खरेदी करतात वाचकांना प्रत्येक नवीन प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांचे माहिती त्यांना उपलब्ध करून देत असतात माहिती आणि ज्ञान संपादनाच्या साधनांचा उपयोग ही विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना खूप मोठ्या प्रमाणात होतो आहे त्याचबरोबर समाजातील संशोधक शेतकरी उद्योगपती अशा सर्व लोकांसाठी अत्यावश्यक ठरतात त्यामुळे ग्रंथालय हे ज्ञान संपादनाचे प्रवेशद्वार ठरले आहे माहितीचा योग्य असा वापर समाजातील सर्व घटकांना मोठ्या प्रमाणात होत आहे मानव जातीच्या प्रगतीसाठी ज्ञानाचा खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होतो ज्ञान संपादन करण्यासाठी माहितीचा वापर करून समाजाचा विकास होतो ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचे भांडार नसून ते माहिती व ज्ञान संपादनाचे सर्वसमावेशक केंद्र आहे. आजच्या एकविसाव्या शतकात पारंपारिक सेवेबरोबरच डिजिटल साधनांचा वापर करून ग्रंथालय समाजाच्या सर्व घटकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहेत पारंपारिक सेवा आणि आधुनिक सेवा या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आजची ग्रंथालय समाजाला सेवा देण्याचे कार्य खूप चांगल्या रीतीने करत आहेत मानवासाठी ज्ञान हेच प्रभावी साधन ठरले आहे ज्ञानाशिवाय व्यक्ती समाज आणि राष्ट्र यांचा विकास होणार नाही ग्रंथालयातून विश्वसनीय व प्रामाणिक माहिती मिळते ज्ञानाची व्याप्ती प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढले आहे ग्रंथालयातील सेवा माहिती संपादनाची साधने हे देखील काळाच्या गरजेनुसार बदलत गेले आहेत मानवाची ज्ञान प्राप्त करण्याची प्रवृत्ती ही अखंड चालू आहे या ज्ञान मिळवण्यामध्ये ग्रंथालयाचा खूप मोठा वाटा आहे. ग्रंथालयाला मानवाचे ज्ञानमंदिर म्हणून ओळखले जाते ज्ञानाचा खजिना येथे मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे शिक्षण संशोधन माहिती व संस्कृतीचा विकास यामध्ये ग्रंथालयाचे खूप मोठे योगदान आहे ग्रंथालयातील सेवा ही पुस्तक देवघे विद्यार्थी मर्यादित नसून माहिती व ज्ञान संपादनाची प्रभावी साधने उपलब्ध करून देण्याचे कार्य करते माहिती विस्फोटाच्या युगात माहितीचा प्रसार आणि प्रचार हा वेगाने होत आहे माहिती प्राप्तीची प्रक्रिया पारंपारिक ग्रंथालय पद्धतीत वेळ खाऊ आणि मर्यादित आहे या उलट डिजिटल पद्धतीत ती जलद परिणामकारक सेवा दिली जाते यामध्ये डिजिटल लायब्ररी इ बुक्स ऑनलाईन डेटाबेसेस इंटरनेट सुविधा माहिती तंत्रज्ञानामार्फत विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना या सेवा दिल्या जातात

माहिती साधने मानवी विकास करण्यासाठी ज्ञान आणि शिक्षण संशोधन संस्कार विचार मंथन यामध्ये माहिती व ज्ञान केंद्रस्थानी आहे ग्रंथालयाची सुरुवात मातीच्या फल्यापासून चालू आहे पुढे मुद्रण कलेचा शोध लागला मुद्रण कलेच्या यशोदामुळे मुद्रित पुस्तके सहजरित्या उपलब्ध झाली आणि त्यामुळे ग्रंथालयाची संकल्पना दृढ झाली काळानुसार माहिती मिळवण्यासाठी गरज वाढू लागले ग्रंथालयातील सेवा सुविधांमुळे ज्ञान मिळवणे खूप सोपे झाले आहे ग्रंथालय हे ज्ञानाचे मंदिर आहे ग्रंथालयात पारंपारिक सेवेबरोबरच आधुनिक सेवा दिल्या जातात ग्रंथालय हे मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त आहे ग्रंथालयामुळे विद्यार्थ्यास वाचनाची सवय मोठ्या प्रमाणात लागते. ग्रोगन यांनी माहिती साधनाचे तीन प्रकारात आणि डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी चार प्रकारात वर्गीकरण केले आहे माहिती कुठेही येऊ शकते वैयक्तिक अनुभव पुस्तके, लेख तज्ञाच्या मते विश्वकोश वेब ही माहिती देणारी साधने आहेत प्रिंट स्त्रोत हे माहितीचे स्त्रोत आहे जे मुळात प्रकाशित झाले होते आणि पेपरवर मुद्रित करून लोकांना उपलब्ध

करून दिले जाते यात पुस्तके मासिके वृत्तपत्रे विश्वकोश जर्नल्स अक्षरे इत्यादींचा समावेश आहे मुद्रित माध्यमाचे प्रकार मुद्रित पत्रके मुद्रित कार्ड पुस्तके नियतकालिके वर्तमानपत्रे अमुद्रित स्त्रोत विना प्रिंट स्त्रोत मीडिया आहेत माहिती अपारंपारिक स्वरूपात उपलब्ध आहे फोटोग्राफ, चित्रपट, स्लाईड, पारदर्शकता, फोन रेकॉर्डिंग, डिस्क सव्हर, ऑडिओ टेप, व्हिडिओ टेप, नकाशा, ॲटलास, ग्लोब, मायक्रोफोन्स, ही आहेत.

**ग्रंथालयातील पारंपारिक सेवा:**

पारंपरिक सेवेमध्ये वाचनालय सेवा संदर्भ सेवा ग्रंथ देवघेवसेवा कॅटलॉग अनुक्रमणिका सेवा वाचन प्रबोधन कार्यक्रम या सेवा उपलब्ध आहेत. वाचकांना अभ्यास वाचन व चिंतनासाठी आवश्यक पुस्तके उपलब्ध करून दिली जातात. तसेच नियतकालिके विरुद्ध पत्रे उपलब्ध करून दिली जातात.

**वाचनालय सेवा:** वाचकांना त्यांच्या आवडीची पुस्तके मासिके आणि ग्रंथ दिले जातात प्रत्येक वाचक हा वेगळा असतो कुणाला कथा कादंबरी तर कुणाला आत्मचरित्र वाचायला आवडतात किंवा एखाद्याला सकारात्मक मार्गदर्शन करणारे पुस्तके वाचायला आवडतात प्रत्येक वाचकाला त्यांच्या आवडीनुसार पुस्तकांची सेवा दिली जाते ही सेवा वाचन संस्कृतीचा पाया आहे विद्यार्थ्यांना शांततेत वाचन करण्यासाठी एका सेपरेट जागेची सोय केलेली आहे विद्यार्थ्यांसाठी गटानुसार अभ्यास करण्यासाठी चर्चा करण्यासाठी सेपरेट कक्षाची निर्मिती केलेली आहे.

**ग्रंथालय देवघेव सेवा:** पुस्तके, जर्नल्स आणि इतर अभ्यासामध्ये विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देणे त्यांचे नूतनीकरण करून विद्यार्थ्यांना ते वेळेत परत करण्याची सूचना देणे ग्रंथालयात ही सेवा खूप मोठ्या प्रमाणात दिली जाते. विद्यार्थ्यांना सुद्धा त्याचा खूप फायदा होतो. विद्यार्थी पुस्तके मोठ्या प्रमाणात नेतात व वेळेत परत देतात ग्रंथालय देवघेवसेवा ही खूप प्रभावशाली सेवा आहे.

**संदर्भ व माहिती सेवा:** आवश्यक पुस्तके लेख किंवा डेटाबेस शोधण्यास विद्यार्थ्यांना मदत करणे वाचकांना त्याचे वाचन साहित्य व माहिती देण्यासाठी केलेल्या वैयक्तिक मदतीस संदर्भ सेवा म्हणतात संदर्भ ग्रंथ हा एखाद्या गोष्टीविषयी माहिती हवी असेल तर ज्या संदर्भात माहिती हवी असेल तर ज्या तेवढीच माहिती आपण त्या संदर्भात ग्रंथाद्वारे मिळवू शकतो.

**कॅटलॉग अनुक्रमणिका सेवा:** पुस्तकांचा योग्य क्रम लावणे त्यामुळे वाचकांना त्यांना मागणी केलेले पुस्तक क्रमाने लावले असल्यामुळे ते पटकन देता येते.

**वाचन प्रबोधन कार्यक्रम:** वाचन प्रबोधन हा असा कार्यक्रम आहे जो वाचकांची संख्या वाढवण्यासाठी मदत होते वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी तयार केला जातो यामध्ये पुस्तके वाचणे पुस्तके वाचायला देणे वाचन स्पर्धा आयोजित करणे आणि विविध ग्रंथालयामध्ये वाचन सुविधा उपलब्ध करून देणे यांसारख्या गोष्टींचा समावेश होतो वाचनामुळे लहान मुलांमध्ये किंवा सर्व वयोगटातील व्यक्तीमध्ये मूलभूत वाचन क्षमता विकसित होते. विविध गट एकत्र येऊन पुस्तके वाचतील अशा उपक्रमाचे आयोजन करणे, वाचनाचे कौशल्य कशी सुधारावेत यावर कार्यशाळा घेणे वाचलेल्या पुस्तकावर चर्चा करण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी कार्यक्रम आयोजित करणे. महाविद्यालयाने विद्यापीठे आणि सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये वाचनासाठी सोयी सुविधा पुरविणे.

**नियतकालिके व वृत्तपत्रे:** विद्यार्थ्यांना नियतकालिके देण्याची सेवा ग्रंथालयातून दिली जाते त्यांना नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचता येतात. तसेच वृत्तपत्रे देखील दिली जातात ग्रंथालय जेवढी वृत्तपत्रे

घेतले जातात ते विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी दिले जातात.

**करंट अवेअर सेवा:** शिक्षकांना नवीन आलेल्या पुस्तकांची माहिती सांगणे प्राध्यापकांना ग्रंथालयातील जर्नल्स व प्रकाशनांची माहिती उपलब्ध करून देणे शिक्षकांना ऑनलाइन माहिती देणे आणलीसचे सभासद करून घेणे प्राध्यापकांना डिजिटल लायब्ररी बाबत माहिती सांगणे त्याचा वापर करण्यास सांगणे.

**संशोधन सहाय्यक संशोधन:** डेटाबेस संदर्भ व्यवस्थापन साधने व जर्नल सूचना प्राध्यापकांना संशोधनासाठी काही साहित्य उपलब्ध करून देणे विद्यार्थ्यांचे प्रबंध तपासण्यासाठी प्राध्यापकांना प्रवृत्त करणे लेख तपासण्यासाठी प्राध्यापकांना त्यांच्या गरजेनुसार साहित्य समीक्षा ग्रंथसूची या विषयानुसार संसाधने उपलब्ध करून देणे.

**अध्यापन सहाय्यक** प्राध्यापकांना कोर्स घेण्यासाठी साहित्य लागणार आहे ते उपलब्ध करून देणे त्यांना कोर्स घेण्यास प्रवृत्त करणे त्यांना डिजिटल साधनांची मदत देणे अध्यापनासाठी लागणारी साधने उपलब्ध करून देणे.

**संस्थात्मक भांडार:** प्राध्यापकांचे संशोधन लेख प्रबंध व प्रकाशाने साठवणे शिक्षकांनी केलेले संशोधनाची जोपासना ग्रंथालयात केली जाते त्यांचे हे संशोधन लेख इतर प्राध्यापकांना बघून नवीन विषय घेऊन ते प्रबंध लेख करू शकतात प्राध्यापकांनी केलेले प्रबंध लेख करू शकतात प्राध्यापकांनी केलेले प्रबंध ग्रंथालयात साठवले जातात.

**आंतर ग्रंथालय कर्ज व दस्तऐवज वितरण:** काही प्राध्यापकांना जे दुर्मिळ पुस्तके असतात त्यांची गरज लागते तेव्हा या दुर्मिळ साहित्याची मदत शिक्षकांना होते हे दुर्मिळ साहित्य जपून ठेवले जाते ग्रंथालयामध्ये जुने संशोधन पेपर्स मिळण्यासाठी ग्रंथालयाची मदत होते कारण ही संशोधन पेपर्स ग्रंथालय मध्ये जपून ठेवले जातात.

**कॉपीराईट व मुक्त प्रवेश मार्गदर्शन:** प्राध्यापकांना पुस्तके प्रकाशित करण्यासाठी प्रोत्साहन देणे त्यांना प्रकाशकांची माहिती देणे ओपन एक्सेस म्हणजे निशुल्क उपलब्धता बंधन युक्त वापर ओपन एक्सेस प्रकारातील साहित्य हे डिजिटल किंवा इंटरनेटवर उपलब्ध होणारे असते ते निशुल्कपणे उपलब्ध होते तसेच ते कॉपीराईट मुक्त असते व त्यास लायसन्सचे बंधन नसते. Open Access Journals नियतकालिकांना वर्गणी भरण्याची गरज नसते ओपन एक्सेस जनरल्स डी ओ ए आय या नावाच्या संकेतस्थळात ओपन एक्सेस नियतकालिकांची यादी त्यांच्या लिंकसह उपलब्ध आहे. जाहिराती स्वीकारून किंवा वार्षिक सभासद वर्गणीतूनही असा खर्च भरून काढला जातो या सर्व कार्याचा मुख्य उद्देश दर्जेदार साहित्य वाचकांना निशुल्करित्या उपलब्ध करून देणे हा आहे थोडक्यात विद्यार्थी शिकण्यासाठी लागणारी संसाधने अभ्यास सहाय्य व कौशल्य विकास साधने मिळतात.

## ग्रंथालयातील आधुनिक सेवा:

तंत्रज्ञानाचा वापर करून वापरकर्त्यांना अधिक वेगवेगळ्या सोयीस्कर आणि प्रभावी माहिती उपलब्ध करून देणे आजच्या एकविसाव्या शतकात माहिती व ज्ञानाचा विस्कृत झालेला आहे. संपूर्ण जग डिजिटल तंत्रज्ञानाने बनलेले आहे. डिजिटल साधनांचा वापर शिक्षण संशोधन उद्योग अशा अनेक क्षेत्रात वाढलेला आहे यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता डिजिटलायझेशन मोबाईल ॲप्स इंटरनेट लर्निंग क्लाऊड स्टोरेज शैक्षणिक ग्रंथालयांना ऊर्जा मिळालेली आहे आधुनिक ग्रंथालयांमध्ये खूप मोठा बदल झाला आहे.

**डिजिटल ग्रंथालय प्रवेश:** ही पुस्तके ई जर्नल्स ऑनलाईन डेटाबेस व मल्टीमीडिया साधनांचा वापर ग्रंथालयात करणे ही ग्रंथालय ही संगणक प्रणाली विविध प्रकारच्या ग्रंथालयासाठी उपयुक्त आहे यांचे किंमत ग्रंथालयांना परवडणारी आहे मल्टीमीडिया साधने हे इलेक्ट्रॉनिक उपकरण आणि सॉफ्टवेअर आहे जे टेक्स्ट चित्र ऑडिओ व्हिडिओ आणि मिशन अशा वेगवेगळ्या सामग्री बनवण्यासाठी संपादित करण्यासाठी किंवा प्रस्तुत करण्यासाठी वापर केला जातो जी उपकरणे आणि सॉफ्टवेअर ए भिन्न माध्यमाचा उपयोग करून संप्रेषित करण्यासाठी मदत करते आणि यामध्ये स्पीकर मायक्रोफोन वेबकॅम डिजिटल कॅमेरा, स्मार्टफोन, कॉम्पुटर आणि मल्टीमीडिया निर्माण व संपादन करण्यासाठी ॲप्स चा उपयोग केला जातो.

**ई-लायब्ररी सेवा:** कागदपत्र ऐवजी इलेक्ट्रॉनिक दस्ताऐवजांचा वापर करणे यांत्रिकीकरणामुळे प्रलेखांचे वाटप करणे पूर्वीपेक्षा सोयीचे झाले आहे. ही लायब्ररीमध्ये वाचकांना पुस्तके वाचता येते आपण कोणत्याही ठिकाणी किंवा घरी बसून सुद्धा या सेवेचा लाभ घेऊ शकतो यामध्ये ई-बॉक्स ई जर्नल्स व ऑनलाइन साहित्य वाचता येते यामध्ये वेळेचे कोणतेही लिमिट नाही त्यामुळे आपल्याला जे ज्ञान हवे आहे ते सुलभ रित्या प्राप्त होते. ही ग्रंथ इलेक्ट्रॉनिक स्वरूपात एक पुस्तक आहे इंटरनेट द्वारे ही ग्रंथ खरेदी करणे आणि डाऊनलोड करणे अतिशय सोपे झाले आहे. ही ग्रंथ निर्मितीसाठी कमी खर्च लागतो त्याऐवजी छापील पुस्तके तयार करण्यासाठी वेळ आणि पैसा लागतो किती ग्रंथाला वेळ कमी आणि पैसा सुद्धा कमी लागतो.

**मल्टीमीडिया स्वरूप:** आपल्या नेहमीच्या मुद्रेत ग्रंथाप्रमाणे एक ग्रंथांमध्ये केवळ मजकूर आणि प्रतिमाच नसून ऑडिओ आणि व्हिडिओ देखील असू शकतात तो ऑडिओ आवृत्ती स्वरूपात असतील आणि आपण तो मजकूर स्वरूपात वाचू इच्छित असाल तर आपण पीडीएफ मध्ये टेक्स्ट रूपांतरित करू शकता आजच्या युगात ऑडिओ बुक्स सीडी डीव्हीडी कोर्स शैक्षणिक व्हिडिओ यांचा संग्रह असतो त्यामुळे वापर करताना शिक्षण घेणे अधिक सोयीचे झाले आहे. अनेक एक ग्रंथ एक शोध बटन ठेवतात त्यामुळे आपणास आपल्याला हवा असलेल्या शब्द असलेल्या पृष्ठावर त्वरेने जाण्यास अनुमती मिळते इलेक्ट्रॉनिक फाईल हाताळत असल्यामुळे आपण वेब वरून ती डाऊनलोड करू शकतो कोणताही खर्च लागत नाही आपल्या संगणकावर ई-बुक शोधणे सोपे आहे ही ग्रंथ पर्यावरणासाठी चांगली आहेत. आपण झाडांना तोडत नाही त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण होण्यास मदत होते.

**ऑनलाईन कॅटलॉग:** ओपॅक म्हणजे ऑनलाईन पब्लिक ऍक्सेस कॅटलॉग होतो. ज्याद्वारे लायब्ररी मधील पुस्तके आणि इतर साहित्य ऑनलाइन शोधता येते या सेवामुळे वाचकांना लायब्ररीमध्ये उपलब्ध असलेले साहित्य एकाच ठिकाणी संगणक किंवा इंटरनेट द्वारे शोभता येते त्यामुळे त्यांना जी माहिती हवी आहे ती सोयीस्करपणे मिळते पप्या हा लादरीतील सर्व पुस्तके व इतर साहित्याचा एक ऑनलाईन डेटाबेस असतो. या सेवेमुळे वापर करते लेखक विषय किंवा पुस्तकांच्या शीर्षकानुसार साहित्य शोधू शकतात ही सेवा वापर करताना घरबसल्या किंवा लायब्ररीमध्ये बसून पुस्तके शोधण्याची सुविधा देते विविध भाषांमध्ये आहे परंतु ओपेक सेवा म्हणजे लायब्ररीतील माहितीचा ऑनलाईन शोध घेण्याची एक सोपी आणि प्रभावी पद्धत आहे.

**डिजिटल संदर्भसेवा:** डिजिटल संदर्भ सेवा म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून ग्रंथालयातील व्यवसायिकांकडून पुरविली जाणारी माहितीची सेवा

होय ही सेवा वापर करताना ईमेल वेब फॉर्म किंवा चाटद्वारे प्रश्न विचारण्याची आणि उत्तरे मिळवण्याची सुविधा देते ज्यामुळे ते ग्रंथालयात प्रत्यक्ष न जाता किंवा समोरासमोर संवाद न करता ही माहिती मिळू शकतात वापर करते कुठेही आणि कधीही या सेवेचा लाभ घेऊ शकतात त्यांना ग्रंथालयात येण्याची गरज नसते ही सेवा ई-मेल वे फॉर्म चॅट किंवा इतर ऑनलाईन साधनांचा वापर करून संवाद साधते या सेवेमध्ये माहिती तज्ञ किंवा ग्रंथपाल वापरकर्त्यांना अचूक आणि योग्य माहिती शोधण्यास मदत करतात जेव्हा वापरकर्त्यांना माहितीची गरज असते तेव्हा डिजिटल संदर्भ सेवा त्यांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देते.ई-जर्नल्स ई-बुक्स डिजिटल रेपोझिटरी ओपन एक्सेस जर्नल्स यांचा समावेश या सेवांमध्ये होतो.

**इंटरनेट व वाय-फाय सुविधा:** आधुनिक ग्रंथालयांमध्ये वाचकांच्या सेवेसाठी मोफत इंटरनेट व वायफाय सुविधा दिली जाते इंटरनेट हे जगभरातील संगणक सर्वर आणि केबलचे झाले आहे तर वाय-फाय हे एक तंत्रज्ञान आहे जी रेडिओ लहरीच्या मदतीने या इंटरनेटची वायरलेस पद्धतीने उपकरणे जोडते वायफाय मुळे तुम्ही तुमच्या घरात ऑफिसमध्ये किंवा वायफाय हॉटस्पॉट वापरू शकता इंटरनेट ही माहितीची खाण आहे आणि वायफाय हे एक वायरलेस नेटवर्क प्रोटोकॉल आहे जे उपकरणांना रेडिओ लहरी वापरून इंटरनेटची जोडते वायफाय मुळे तुम्ही घरात कार्यालयात किंवा वायफाय हॉटस्पॉट उपलब्ध असलेल्या ठिकाणी इंटरनेट वापरू शकता थोडक्यात इंटरनेट हे जाळे आहे आणि वायफाय हे त्या जाळ्यांची बाहेर शिवाय कनेक्ट होण्याची सुविधा आहे या सोयीमुळे ऑनलाइन वाचन ई लर्निंग माहिती शोध तसेच संशोधन सोपे होते. आधुनिक ग्रंथालयांमध्ये प्राध्यापकांना आणि विद्यार्थ्यांना या सेवेचा खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होत आहे.

**प्रबंध व संशोधन सेवा:** ही प्रबंध आणि संशोधन सेवा म्हणजे शैक्षणिक संशोधनास मदत करणारी व्यावसायिक सेवा होळीची तुम्हाला प्रबंध थिस इस लिहिण्यासाठी उपयोगी पडते आणि संशोधनाच्या विविध टप्प्यांमध्ये मदत करते या सेवांमध्ये संशोधन विषय निवडणे माहिती गोळा करणे लेखन करणे पुनर्वाचन करणे आणि अंतिम प्रबंध सादर करण्यापर्यंत मार्गदर्शन करणे विषय निवडण्यासाठी आणि त्याचे मार्गदर्शन करून घेण्यासाठी उपयोग होतो संशोधन आणि माहिती संकलन करण्यासाठी आवश्यक साहित्य आणि माहिती गोळा करणे आणि अभ्यासाची रूपरेषा तयार करणे प्रबंधाचा मसुदा तयार करणे त्याचे स्वरूपण करणे आणि लेखन प्रक्रियेत मदत करणे. लिहिलेल्या प्रबंधातील चुका सुधारणे व्याकरण तपासणे आणि त्याची गुणवत्ता वाढवणे दिलेल्या वेळेत प्रबंध सादर करण्यासाठी मदत करणे विद्यार्थ्यांच्या संशोधनाच्या प्रक्रियेत मदत मिळाल्याने त्यांचा वेळ वाचतो विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाच्या क्षेत्रात कौशल्य दाखवण्यास मदत होते या सोयीमुळे प्रबंध लिहिण्याचा तणाव कमी होतो आणि विद्यार्थी आत्मविश्वासाने पुढे जाऊ शकतात संशोधनासाठी योग्य विषय निवडण्यास मदत करणे, गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करून त्यातून निष्कर्ष काढणे प्रबंध हे एक अंतिम उत्पादन आहे त्याच्यामध्ये तुमचे संपूर्ण संशोधन सादर केलेले असते.

**संगणकीकृत बारकोड प्रणाली:** संगणक आणि बारकोडप्रणाली या दोन्ही स्वयंचलित प्रणाली आहेत ज्या माहिती गोळा करण्यासाठी साठवण्यासाठी आणि वापरण्यासाठी वापरले जातात बारकोड हे संख्या आणि वर्गांची संगणक वाचनीय प्रतिनिधित्व आहे ज्या समांतर काळ्या आणि पांढऱ्या पट्ट्या असतात ज्या बारकोड स्कॅनर वाचू शकतो सुपर मार्केटमधील वस्तूंची

किंमत काढण्यापासून ते पुरवठा व्यवस्थापनापर्यंत अनेक ठिकाणी या प्रणालीचा उपयोग होतो ग्रंथालयात पुस्तके स्तन करण्यासाठी त्यांचा वापर होतो बारकोड स्कॅनर बारकोड आणि ती माहिती संगणक पाठवतो संगणक ती माहिती मात्र वस्तूची किंमत दाखवतो किंवा स्टॉप ची नोंद करतो ही प्रक्रिया स्वयंचलितपणे होते ज्यामुळे चुका कमी होऊन काम जलद होते पुस्तकांची देवघेव करण्यासाठी याचा वापर होतो नोंदणी आणि परतावा पूर्णपणे संगणकावर असल्याने वेळेचे बचत होते स्टॉक चेकिंग घेताना बारकोड स्कॅनर चा खूप मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. बारकोड स्कॅनिंगमुळे चुका कमी होतात आणि अचूक पुस्तकाचे स्कॅन होते. या बारकोड प्रणालीमुळे ग्रंथालयाचे काम सुलभ रित्या पूर्ण होण्यास मदत मिळते.

**ई लर्निंग व मॉक कोर्सेस:** मराठीमध्ये लर्निंग आणि मोकर्ससाठी स्वयं या भारत सरकारच्या प्लॅटफॉर्मला भेट देऊ शकतो जिथे मोफत ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध होतील हे भारत सरकारने सुरू केलेला एक मोफत प्लॅटफॉर्म आहे विविध यांत्रिक साधनांचा उपयोग करून वेगवेगळ्या विषयांचे स्वयं अध्ययन अथवा अध्यापन करणे म्हणजे शिक्षण होय. माणसाने आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर माहितीचा साठा करणारी मुद्रण कलेचा शोध छायाचित्रण व निमंत्रण शिक्षणात संगणक भ्रमणध्वनी नियंत्रित साधनांचा वापर इ शिक्षणात होत आहे या मॉक कोर्समुळे विद्यार्थ्यांना नवीन कौशल्य शिकण्याची संधी मिळते कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त अध्यापन होते अध्ययनात किंवा अध्यापनात येणाऱ्या अडचणीचे ई शिक्षणामुळे तात्काळ निरसन केले जाते हे शिक्षण कोणीही घेऊ शकतो तसेच ते कोठेही आणि केव्हाही उपलब्ध होते. ज्ञान मिळवण्याचा स्त्रोत म्हणून वापर होतो शैक्षणिक संशोधनासाठी वापर होतो. विद्यार्थ्यांच्या अध्ययन अडचणीचे निरसन यामुळे होते व्यक्तिमत्ते उच्च विचार प्रक्रियेचा विकास होतो कमीत कमी वेळात जास्तीत जास्त अध्ययन करता येते

**मोबाईल ॲप सेवा:** मोबाईल ॲप सेवा ही खूप प्रभावी आहे कारण प्रत्येक विद्यार्थ्यांच्या हातात पार्ट फोन आलेला आहे यामुळे ग्रंथालय मोबाईल ॲप्स च्या माध्यमातून सेवा देत आहेत विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या माहिती करता किंवा कोड्स अलर्ट सेवा एसएमएस सेवा या अत्याधुनिक सेवांचा वापर ग्रंथालयातून होत आहे माहिती कुठेही कधीही केव्हाही कोणत्याही वेळी उपलब्ध होत आहे प्राध्यापकांना सुद्धा संशोधन कामांमध्ये नैतिकता यावी यासाठी संशोधकांना त्याची लगे रिजन तपासणी साधने ट्युशन संदर्भ व्यवस्थापन सॉफ्टवेअर मेंडेलीटी रोटी रम यांची सोय उपलब्ध करून दिली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना खूप मदत होते आहे त्यांच्या संधी वाढल्या आहेत अध्यापन करणे प्राध्यापकांना सोपे झाले आहे या ॲप्स द्वारे प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना सुलभ माहिती मिळण्यास मदत झाली आहे.

**इन्फ्लिबनेट:** तालिका सेवा यात सर्व सहवाचन साहित्याची संगत आले का व सहकारी तालिका ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध आहे डेटाबेस सेवा ग्रंथ नियतकालिकेत शोध प्रबंध व संशोधनाचे डेटाबेस ऑनलाइन व ऑफलाइन सुरुवात उपलब्ध आहेत वितरण सेवा या सेवेअंतर्गत आंतर ग्रंथालय रण किंवा फॅक्स द्वारे ही सेवा दिली जाते संप्रेषण सेवा नेटवर्क रेफरल सेवा ईमेल सेवा बोर्ड सेवा उपलब्ध करून देतात प्रशिक्षण कार्यक्रम संगणक नेटवर्क वगैरे संदर्भात ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षण राबवले जाते.

**आव्हाने :**

**आर्थिक आव्हाने:** डिजिटल साधनांचा वापर करण्यासाठी प्रचंड आर्थिक खर्च येतो या सेवा खर्चिक असतात मर्यादित निधीमुळे ग्रामीण भागातील महाविद्यालयांना डिजिटल साधने घेण्यास अडचणी येतात अनेक शैक्षणिक संस्था डिजिटल संसाधने टिकवून ठेवू शकत नाहीत प्रकाशन संस्था कडून मिळणारी जर्नल व वार्षिक परवाना शुल्क खूप जास्त असतो त्यामुळे ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थाकडे इतका निधी उपलब्ध नसतो.

**तांत्रिक आव्हाने:** डिजिटल ग्रंथालय चालवण्यासाठी इंटरनेट वीज पुरवठा हार्डवेअर आवश्यक असते त्याचप्रमाणे डिजिटल ग्रंथालय चालविण्यासाठी उच्च दर्जाची इंटरनेट सुविधा सर्वर्स क्लाऊड स्टोरेज नेटवर्क सुरक्षा तांत्रिक उपकरणे या सर्वांचा दर्जेदार पुरवठा करणे आवश्यक आहे आपल्या देशात या सेवा पुरविणे अत्यंत अवघड आहे ग्रामीण भागात वीजपुरवठ्याची समस्या मोठी असते.

**मानवी संसाधनाचे आव्हान:** ग्रंथालयातील सेवकांना डिजिटल साधनांचे ज्ञान आणि प्रशिक्षण आवश्यक असते ग्रंथपाल व कर्मचारी यांना डिजिटल साधनांची नवनवीन ज्ञान व प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे पण बऱ्याच ठिकाणी अद्यावत प्रशिक्षण अपुरी सेवकांची व्यवस्था प्रशिक्षण सेवक वर्ग यांचा अभाव असतो या डिजिटल साधनांचे ज्ञान व प्रशिक्षणाच्या अभावामुळे डिजिटल ग्रंथालयाच्या सेवा योग्य त्या क्षमतेने दिल्या जात नाहीत.

**सायबर सुरक्षा धोके:** डिजिटल ग्रंथालय ही इंटरनेटवर आधारित असतात इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात हॅकिंग डेटा चोरी व्हायरस अशा एक ना अनेक धोक्यांना सामोरे जावे लागते संशोधन ई डेटाबेस प्रबंध आणि विद्यार्थ्यांची वैयक्तिक असणारी माहिती सुरक्षित ठेवणे त्याचा योग्य वापर करण्याची मोठी जबाबदारी ठरते.

**भाषिक व सांस्कृतिक आव्हाने:** डिजिटल संसाधने वेगवेगळ्या भाषेत उपलब्ध आहेत सर्व भाषेमध्ये संसाधने उपलब्ध असली तरी इंग्रजी भाषेत जास्त आहेत मराठी हिंदी तमिळ कन्नड या प्रादेशिक भाषा मधील डिजिटल साहित्याशी उपलब्धता तुलनेने कमी आहे या भाषेतील डिजिटल संसाधनाच्या कमी उपलब्धतेमुळे ग्रामीण व प्रादेशिक विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत आवश्यक असणारी माहिती सहज उपलब्ध होत नाही

**माहितीचा अतिरेक** माहितीच्या डिजिटल युगात माहितीचा प्रचंड स्पोर्ट झालेला आहे प्रचंड प्रमाणात माहिती उपलब्ध होत आहे यामुळे वाचकास योग्य माहिती निवडणे अतिशय अवघड जात आहे यासाठी माहिती साक्षरतेचे प्रशिक्षण विद्यार्थी व संशोधक यांना देणे आवश्यक आहे प्रत्येक संस्थेला आर्थिक आव्हाने भेडसावत असतात मर्यादित निधीमुळे डिजिटल संसाधने टिकवून ठेवण्यात मोठ्या अडचणी येतात संसाधनाचे शुल्क खूप असते डिजिटल संसाधनाची सबस्क्रीप्शन पासून परवाना व सॉफ्टवेअर अपडेट या सर्व गोष्टींसाठी मोठ्या प्रमाणात निधी लागत असतो एकदा सुरू केलेल्या सेवा कायम टिकवून ठेवणे आवश्यक असते प्रत्येक संस्थेवर अशी केलेली सेवा टिकवून ठेवणे प्रत्येक संस्थेसमोर मोठे आव्हान व जबाबदारीचे आहे

**निष्कर्ष:**

ग्रंथालय हे ज्ञान माहिती सेवांचे केंद्रबिंदू आहे पारंपारिक स्वरूपात जी पुस्तकांची देव घेऊन नियतकालिकांची देवघेव संदर्भ साधने ते आधुनिक तंत्रज्ञानामुळे डिजिटल पद्धतीने दिली जात आहेत

वाचकांच्या त्यांच्या गरजेनुसार माहिती दिली जाते संशोधकांना विश्वसनीय माहिती देणे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळवून देणे तसेच शिक्षकांना अध्यापनासाठी पूरक साधने उपलब्ध करून दिले जातात डिजिटल ग्रंथालयामुळे हे शक्य झाले आहे आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात समाजात ग्रंथालयातील सेवांचे स्वरूप व्यापक झाले आहे ऑनलाइन डेटाबेस ई पुस्तके ई जर्नल्स मल्टीमीडिया साधने डिजिटल लायब्ररी तसेच इंटरनेटवर नेटवर्किंग सेवा मुळे वाचकांना जगातील माहिती काही क्षणात मिळू शकते ती सुविधा समाजातील शैक्षणिक क्षेत्रात खूप मदत करते त्याचबरोबर समाजाच्या सांस्कृतिक व सामाजिक प्रगतीस देखील चालना दिली जाते. ग्रंथालय आज केवळ ज्ञानसंपादनाचे माध्यम म्हणून न राहता आजीवन शिक्षण वाचन संस्कृतीचे संवर्धन संशोधन वृद्धी तसेच समाज जागृती यामध्येही महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे ग्रामीण व शहरी भागापर्यंत समान संधी दिली जाते ग्रंथालय सेवा ही फक्त पुस्तक देण्यापुरतीच मर्यादित नसून तो ज्ञानाचा मोठा प्रवाह आहे ते ज्ञानाचे मंदिर आहे समाजामध्ये शैक्षणिक बौद्धिक सांस्कृतिक विकास करण्यासाठी खूप मोलाची ग्रंथालय सेवा ही आहे ग्रंथालय हे मोठ्या प्रमाणात माहितीचे स्त्रोत आहे आपल्याला हवी असलेले माहिती ग्रंथालयाच्या सेवेतून क्षणभरातच मिळून जाते यावरून ग्रंथालयातील सेवा या खूप प्रभावी आहेत असे दिसून येते डिजिटल युगातील शैक्षणिक ग्रंथालयांचा प्रवास हा परंपरा आणि आधुनिकता यांचा समन्वय साधणार आहे जीवनभर शिक्षण या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यात आले.

**संदर्भ सूची:**


1. पाटील /सोनवणे पाटील माहिती साधने जळगाव प्रशांत पब्लिकेशन
2. पाटील, पि.टी सोनवणे, पाटील के. एस. ग्रंथालय संगणकीकरण फडके दोन ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण
3. देवधर विजय 2017 ग्रंथालय आणि माहिती शास्त्र यूनिव्हर्सल प्रकाशन पुणे
4. दातार, एनजी ग्रंथालय आणि माहिती शास्त्र
5. एस आर रंगनाथन ग्रंथालयाचे पाच नियम नवी दिल्ली एस राजन पब्लिकेशन